# खांडेनवमी महोत्सवानिमित्त लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन.

सोमवार दिनांक 23 ऑक्टोंबर 2023 रोजी लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये खांडेनवमी हा सण उत्साहात साजरा करण्यात आला, या सणानिमित्त कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी माननीय प्राचार्य श्री सतीश कुमार देवकर सर, प्राचार्य श्री अमोल शिंदे सर, प्राचार्य श्री सचिन फुगे सर, प्राचार्य श्री राहुल जाधव सर यांच्या हस्ते श्री विश्वकर्मा प्रतिमेचे पूजन तसेच शस्त्रपूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षपद प्राचार्य श्री योगेश गायकवाड सर यांच्या निर्देशानुसार मा. संध्याराणी शिंदे मॅडम यांनी भूषवले. दरम्यान लोकमंगल आयटीआय च्या विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तूची निर्मिती या शीर्षकास अनुसरून अभियांत्रिकी प्रोजेक्ट चे प्रदर्शन सादर केले. विजतंत्री प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी आउटडोर कॉन्फरन्स टेबल विथ अम्ब्रेला, नोटीस बोर्ड, पक्षी प्रेमी विद्यार्थ्यांनी पक्ष्यांच्या खाण्याची तसेच पाणी पिण्याच्या सोयीसाठी टाकाऊ वस्तु पासून मॉडेल बनवले,वेल्डर शाखेच्या विद्यार्थ्यांनी शोभेच्या झाडांच्या कुंड्या ठेवण्याचे रॅक, डिझेल यांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी आधुनिक शेती व्यवस्थेच्या मॉडेल चे सादरीकरण केले, तसेच दोन मजली लाकडी घराचे डिझाईन सादर केले, विजतंत्री द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी विविध आकारातले एअर कुलर, इलेक्ट्रिक ओव्हन, रॉकेट स्टोव्ह या प्रकल्पांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे व्यवस्थापकीय नियोजन तसेच महाप्रसादाचे नियोजन लोकमंगल आयटीआय विद्यार्थी संघटनेने केले.

लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या वेल्डर शाखेच्या विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तूंची निर्मिती या उपक्रमा अंतर्गत विविध वस्तूंची निर्मिती केली, बंदिस्त शेळीपालन प्रकल्पामध्ये शेळीच्या खाद्य व्यवस्थापनाकरिता फीड फोडर ही वस्तू विद्यार्थ्यांनी दुरुस्त केली. गेली कित्येक वर्ष ही वस्तू स्क्रॅप मध्ये पडून होती परंतु संस्थेने राबवलेल्या टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ ची निर्मिती या उपक्रमांतर्गत विविध वस्तूंना पुनर्निर्मित करण्यात आले.



फॅब्रिकेशन चे काम संपल्यानंतर शिल्लक राहणारे अनावश्यक लोखंडी तुकडे , स्क्वेअर पाईप, राऊंड पाईप, चॅनल अँगल, इत्यादी वस्तूंचे व्यवस्थापन योग्यरीत्या नाही केली, तर हे तुकडे भंगार भावामध्ये मध्ये विकावे लागतात पण लोकमंगल आयटीआय च्या वेल्डर शाखेच्या विद्यार्थ्यांनी या टाकाऊ तुकड्यापासून शोभेंच्या झाडांच्या कुंड्या ठेवण्यासाठी लोखंडी रॅक बनवले.





*(श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय श्री अमोल शिंदे सर , आणि विजतंत्री विभागाच्या निदेशक संध्याराणी शिंदे मॅडम विद्यार्थ्यांनी निर्माण केलेल्या प्रकल्पाची पाहणी करताना.)*

लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विजतंत्री द्वितीय वर्ष व्यवसायामध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी, जुन्या खराब झालेल्या सिलिंग फॅनला रिपेअर करण्याचे तंत्र, विविध टाकाऊ इलेक्ट्रिक मोटर पासून एअर कुलर, इलेक्ट्रिक ओव्हन, व टाकाऊ लाकडापासून स्वयंपाक करण्याकरिता रॉकेट स्टोव्हची निर्मिती केली.




लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये कमवा व शिका या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना प्रशिक्षण घेत असताना सिलिंग फॅन रिवाइंडिंग करून त्यातून त्यांना मानधन दिले जाते, याच उपक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांनी सिलिंग फॅन रिवाइंडिंग चे मॉडेल सादर केले.






संस्थेमध्ये खराब झालेले प्लायवूडचे तुकडे ,लाकडाचे तुकडे, इत्यादी वस्तूंचे व्यवहारिक मूल्य शून्य असल्याने या टाकाऊ वस्तु पासून ऊर्जा निर्मिती करण्याकरिता विद्यार्थ्यांनी स्टोव्ह ची निर्मिती करण्यासाठी भौतिकशास्त्रामधील विविध नियमाचा अभ्यास करून विशिष्ट अशा रॉकेट स्टोव्ह ची निर्मिती केली

लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या विजतंत्री प्रथम वर्ष विद्यार्थ्यांनी नोटीस बोर्ड, डायरेक्शन बोर्ड, बॅक यार्ड मेटल अम्ब्रेला विथ डायनिंग टेबल, विजतंत्री पीपीई किट चे मॉडेल, भटक्या पक्ष्यांसाठी चारा तशीच पाण्याची व्यवस्था असणारे कॅन, टूल टेबल , इलेक्ट्रिकल जॉइनिंग जॉइंट्स मॉडेल, इलेक्ट्रॉनिक्स इक्विपमेंट अँड ॲक्सेसरीज मॉडेल, इत्यादी वस्तूची निर्मिती केली.,















श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल जैवतंत्रज्ञान व उद्योजकता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सतीश कुमार देवकर सर आणि प्रमुख अतिथी विद्यार्थ्यांनी केलेले प्रकल्प पाहण्याकरिता उपस्थित होते

# खांडेनवमी महोत्सवानिमित्त लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन.




वडाळा : सोमवार दिनांक 23 ऑक्टोंबर 2023 रोजी लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये खांडेनवमी हा सण उत्साहात साजरा करण्यात आला, या सणानिमित्त कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी माननीय प्राचार्य श्री सतीश कुमार देवकर सर, प्राचार्य श्री अमोल शिंदे सर, प्राचार्य श्री सचिन फुगे सर, प्राचार्य श्री राहुल जाधव सर यांच्या हस्ते श्री विश्वकर्मा प्रतिमेचे पूजन तसेच शस्त्रपूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षपद प्राचार्य श्री योगेश गायकवाड सर यांच्या निर्देशानुसार मा. संध्याराणी शिंदे मॅडम यांनी भूषवले. दरम्यान लोकमंगल आयटीआय च्या विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तूची निर्मिती या शीर्षकास अनुसरून अभियांत्रिकी प्रोजेक्ट चे प्रदर्शन सादर केले. विजतंत्री प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी आउटडोर कॉन्फरन्स टेबल विथ अम्ब्रेला, नोटीस बोर्ड, पक्षी प्रेमी विद्यार्थ्यांनी पक्ष्यांच्या खाण्याची तसेच पाणी पिण्याच्या सोयीसाठी टाकाऊ वस्तु पासून मॉडेल बनवले,वेल्डर शाखेच्या विद्यार्थ्यांनी शोभेच्या झाडांच्या कुंड्या ठेवण्याचे रॅक, डिझेल यांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी आधुनिक शेती व्यवस्थेच्या मॉडेल चे सादरीकरण केले, तसेच दोन मजली लाकडी घराचे डिझाईन सादर केले, विजतंत्री द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी विविध आकारातले एअर कुलर, इलेक्ट्रिक ओव्हन, रॉकेट स्टोव्ह या प्रकल्पांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे व्यवस्थापकीय नियोजन तसेच महाप्रसादाचे नियोजन लोकमंगल आयटीआय विद्यार्थी संघटनेने केले.